National Plan for Conservation of Aquatic Eco-systems (NPCA) केंद्र शासन पुरस्कृत कार्यक्रम खर्चातंर्गत धर्मवीर संभाजी (कंबर) तलाव, सोलापूर यांना प्रशासकीय मान्यता व निधी मुक्त करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यावरण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : रासयो-२०१८/प्र.क्र. ३९ /तां.क.२
नवीन प्रशासन भवन,१५ वा मजला,हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : ०७ मार्च, २०१९

संदर्भ : १. सोलापूर महानगरपालिका, पत्र क्र.४८४, दिनांक ०१.११.२०१८
२. पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. ENV-२०१५/C.R. ५६/ TC-३, दिनांक १६.०७.२०१६.
३. पर्यावरण, वन व जलवायू परिवर्तन विभाग, भारत सरकार यांचे प्रथम हप्ता वितरणाबाबतचे पत्र क्रमांक J-२७०१८/२०१५-NRCD, दिनांक २८.०९.२०१८

प्रस्तावना :

१. केंद्र शासनाच्या " National Plan for Conservation of Aquatic Eco-systems (NPCA)"या योजने अंतर्गत तलावांचे संवर्धन करण्यात येते. तलाव हे पाण्याचे मुख्य स्तोत्र असून त्याचा ऱ्हास रोखण्यासाठी त्याचे व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. सदर योजनेचा मूळ उद्देश शहरी व अर्ध शहरी भागातील तलावांचे संवर्धन, प्रदूषित व अवक्रमित तलावांचे व्यवस्थापन करणे हा आहे. तसेच राज्य शासनास तलावाचे शाश्वत व्यवस्थापन व संवर्धन करण्यास प्रोत्साहीत करणे व मदत करणे हे देखील योजनेचे महत्वाचे उद्दिष्ट आहे. योजनेंतर्गत अंतर्भूत उपक्रम खालीलप्रमाणे आहेत:

१) तलावक्षेत्रात प्रदूषण भारांचे नियंत्रण करून, फेरबदल करून मूळ स्रोतांकडून प्रदूषण प्रतिबंध करणे व त्यासाठी सांडपाणी प्रक्रिया करणे.

२) स्थानिक नैसर्गिक गरजेनुसार तलावाच्या स्वच्छतेच्या उपाययोजनांमध्ये जसे की डी-सिल्टींग करणे, डि-विडिंग करणे, बायो-रिमेडिएशन करणे, वायूमियन्स (aeration) करणे, बायो मॅनिप्युलेशन करणे, जलपर्णी वाढीसाठी पोषक असलेले घटक कमी करणे, ॲनोक्सिक हायपोलीन आयन काढणे, पाणथळ जागांची पध्दत निर्माण करणे किंवा इतर कोणतेही यशस्वीरित्या चाचणी केलेले इको टेक्नॉलॉजी वापरणे इ. उपाययोजना करणे.

३) पाणलोट क्षेत्रांत प्रक्रिया करणे ज्यामध्ये वृक्षरोपण करणे, पावसाळी पाण्याचा निचरा करणे, जाळी लावणे इ. उपाययोजना करणे.

४) बांध मजबुतीकरण, सरोवर कुंपण, तटरेखा विकास इ. उपाययोजना करणे.

५) तलावाची प्रथमदर्शनी भागाचा व सार्वजनिक जागेचा विकास करणे.

६) गैर बिंदू स्रोताकडून प्राप्त प्रदूषणास कमी खर्चाचे सॅनिटेशन पुरवून प्रतिबंध करणे.

७) तलावाच्या संवर्धनासाठी जनतेमध्ये जागरुकता आणणे.

८) तलावाच्या संवर्धन क्षेत्रामध्ये क्षमता निर्माण करणे, प्रशिक्षण देणे आणि संशोधन करणे.

९) त्याठिकाणी विशेष आवश्यक असणारे इतर उपक्रम राबविणे.

या योजनेत ६०% केंद्र शासनाचा व ४०% राज्य शासनाचा/संबंधित संस्थेचा आर्थिक सहभाग असणार आहे.

२. सदर योजनेंतर्गत केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व जलवायु परिवर्तन विभागाच्या दिनांक १२.०९.२०१८ च्या प्रशासकीय मान्यतेअन्वये धर्मवीर संभाजी तलावाचे संवर्धन करण्यासाठी National Plan for Conservation of Aquatic Eco-system (एन.पी.सी.ए.) केंद्र शासन पुरस्कृत योजने अंतर्गत धर्मवीर संभाजी तलावाच्या संवर्धनाच्या प्रकल्पास मान्यता मिळाली आहे. केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन विभागाने त्यांच्या दिनांक १२.०९.२०१८ रोजीच्या पत्रांन्वये केंद्र शासनाच्या रु. १२,२१,१३,०००/- (६०%) म्हणजेच रु. ७,३२,६७,८००/- यापैकी प्रथम हप्ता रु. ३,६६,३३,९००/-(रु.तीन कोटी सहासष्ट लक्ष तेहतीस हजार नऊशे मात्र) (३३.३३%) वितरित केला असून राज्याच्या एकत्रित निधीत जमा झाला आहे. तसेच सोलापूर महानगरपालिकेचा रु. ४,८८,४५,२००/- (४०%) यापैकी प्रथम हप्ता रु.१,६२,८०,१०५ /- (रु. एक कोटी बासष्ट लक्ष ऐंशी हजार एकशेपाच मात्र- (३३.३३%) इतका आहे. उपरोक्त प्रकल्पास मान्यता व सदर प्रकल्पाकरिता केंद्र शासनाकडून प्राप्त निधी पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पित करून वितरित करण्यास मंजूरी मिळण्यासाठीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार शासन खालील निर्णय होत आहे.

शासन निर्णय :

१ केंद्र शासन पुरस्कृत केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन विभागाच्या मदतीने राज्यातील तलावाचे संवर्धन करण्यासाठी National Plan for Conservation of Aquatic Eco-system (एन.पी.सी.ए.) अंतर्गत केंद्र शासनाचा ६०% व राज्य शासनाचा ४०% या आर्थिक सहभागाने ही योजना राज्यात राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२ सोलापूर महानगरपालिका यांच्या सोबत जोडलेल्या प्रकल्प अहवालानुसार " प्रपत्र अ" मध्ये नमूद केलेली कामे पूर्ण करण्यासाठी एकूण रुपये १२.२११३ कोटी (रुपये बारा कोटी एकवीस लक्ष तेरा हजार फक्त) इतक्या रकमेस व " प्रपत्र -ब" मधील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. सदर मंजूर एकूण रकमेपैकी ६०% हिस्सा म्हणून केंद्र शासन व ४० % हिस्सा म्हणून सोलापूर महानगरपालिका उपलब्ध करुन देईल. सदर योजनेचा वित्तीय आकृतीबंध पुढीलप्रमाणे आहे.

अ.क्र	**हिस्सा**	**मंजूर निधी (रुपये)**	**अक्षरी मंजूर निधी**
१	६०% केंद्र शासन हिस्सा	७,३२,६७,८००	रुपये सात कोटी बत्तीस लक्ष सदुसष्ट हजार आठशे फक्त
२	४०% सोलापूर महानगरपालिकेचा हिस्सा	४,८८,४५,२००	रुपये चार कोटी अठठयाऐंशी लक्ष पंचेचाळीस हजार दोनशे फक्त
	एकूण	**१२,२१,१३,०००**	(रुपये बारा कोटी एकवीस लक्ष तेरा हजार फक्त)

३ केंद्र पुरस्कृत सरोवर संवर्धन योजनेअतंर्गत धर्मवीर संभाजी तलावाचे पर्यावरणदृष्टया संवर्धन करण्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या एकूण १२,२१,१३,०००/- (रुपये बारा कोटी एकवीस लक्ष तेरा हजार फक्त) पैकी या शासन निर्णयाव्दारे रु. ३,६६,३३,९००/- (रु तीन कोटी सहाशष्ट लक्ष तेहतीस हजार नऊशे मात्र) इतकी रक्कम खर्च करण्यास सोलापूर महानगरपालिका यांना या शासन निर्णयाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

४ यासाठी सोलापूर महानगरपालिका यांचे नावे रु. ३,६६,३३,९००/- (रु. तीन कोटी सहासष्ट लक्ष तेहतीस हजार नऊशे मात्र) एवढया रकमेचा धनादेश काढण्यात यावा.

५ सोलापूर महानगरपालिका यांना अदा करण्याची रक्कम रु. ३,६६,३३,९००/- (रु. तीन कोटी सहासष्ट लक्ष तेहतीस हजार नऊशे मात्र) एवढी रककम अधिदान व लेखाधिकारी यांच्यामार्फत कोषागारातून काढून आयुक्त्, सोलापूर महानगरपालिका यांना अदा करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून श्रीम. शिल्पा चं. शिर्के, कार्यासन अधिकारी, पर्यावरण विभाग व नियंत्रक अधिकारी म्हणून श्री. सु.कि. निकम, उपसचिव, पर्यावरण विभाग मंत्रालय यांना घोषित करण्यात येत आहे. त्यांनी सोलापूर महानगपालिका यांना रु. ३,६६,३३,९००/- (रु. तीन कोटी सहासष्ट लक्ष तेहतीस हजार नऊशे मात्र) अधिदान व लेखाधिकारी कार्यालय, मुंबई येथून स्वतंत्र धनादेशाव्दारे वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

६ सदर प्रयोजनार्थ होणारा खर्च हा मागणी क्र. यु-०४, ३४३५ परिस्थितीकी व पर्यावरण ०४-प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण, १०३ वायु व जल प्रदूषण प्रतिबंध, (१०४) नॅशनल प्लॅन फॉर काँझरवेशन ऑफ ॲक्वेटीक इको-सिस्टीम (NCPA) (केंद्र पुरस्कृत योजना) (३४३५१३७४) (०४) (०१) सरोवर संवर्धन योजना (वेतनेतर) या मुख्य-लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ वर्षात अर्थसंकल्पीत रु. ४३.६९ कोटीच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा व त्याचा लेखाशिर्षाखाली वर्गीकृत करण्यात यावा.

७ हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्र. ०६/१९/व्यय-१६ दिनांक १४.१.२०१९ अन्वये, तसेच वित्त विभागाच्या शासन वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि. २ एप्रिल, २०१८ च्या परिशिष्टातील अनुक्रमांक १,२,३,५,७ या प्रकरणी लागू नाही तसेच सदर परिशिष्टातील अनुक्रमांक ४ बाबत नमूद करण्यात येते की, ही योजना केंद्र पुरस्कृत आहे. (६० टक्के हिस्सा) केंद्र शासनाकडू निधी प्राप्त झाल्याची खात्री वित्त विभागाच्या अर्थोपोय शाखेच्या दि. २८.२.२०१९ च्या टिप्पणी अन्वये करण्यात आली आहे. तसेच, वित्त विभागाने बीडीएस व्दारे रु.१७५०.०० लक्ष इतका निधी विभागास वितरीत केला आहे.

८ वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३,दि.२ एप्रिल,२०१८ च्या परिपत्रकासोबत परिशिष्टातील अनुक्रमांक ३ च्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, सदर योजनेच्या स्वरुपात अथवा व्याप्तीमध्ये कसलाही बदल करण्यात आलेला नाही.

९ वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं २०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि. २ एप्रिल, २०१८ रोजीच्या परिपत्रकासोबतच्या परिशिष्टातील अ.क्र.८ संदर्भातील तपासणी सूचीमधील अनुक्रमांक १, २, ४ मध्ये नमूद करण्यात आलेल्या अटींची पूर्तता होत आहे. तसेच सदर अनुक्रमांक ८ संदर्भातील तपासणी सूचीमधील अनुक्रमांक ३ व अनुक्रमांक ५ ते १० या प्रकरणी लागू नाही.

१० याशिवाय वित्त विभगाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थस २०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३ दि.३०.६.२०१७ अन्वये परिच्छेद क्र.४ मधील खालील बाबींची पुर्तता होत आहे.

१. सदर प्रयोजनाथ्र होणारा खर्च हा मागणी क्र. यु-०४, ३४३५ परिस्थितीकी व पर्यावरण ०४-प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण, १०३ वायु व जल प्रदूषण प्रतिबंध, (१०४) नॅशनल प्लॅन फॉर कॉंझरवेशन ऑफ ॲक्वेटीक इको-सिस्टीम (NCPA) (केंद्र पुरस्कृत योजना) (३४३५१३७४) (०४) (०१) सरोवर संवर्धन योजना (वेतनेतर) या मुख्य-लेखाशिर्षाखाली कोणतेही संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.

११. हा शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.,maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३०७१७३७५७२४०४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shuddhodhan D Aher

Digitally signed by Shuddhodhan D Aher
DN: CN = Shuddhodhan D Aher, C = IN, S = Maharashtra, O = Government of Maharashtra, OU = Environment Department
Date: 2019.03.07 17:41:53 +05'30'

(शु. द. अहेर)
उप सचिव (पर्यावरण),
महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राज भवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. मंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव (पर्यावरण), मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव (ऊर्जा), मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. महालेखापाल (लेखापरिक्षा)-१, महाराष्ट्रमुंबई-४०००२०
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई-४०००२०
१२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
१३. महालेखापाल (लेखापरिक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१४. अधिदान व लेखाधिकारी, वांद्रे (पूर्व) मुंबई-४०००५१.
१५. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१६ निवासी लेखाधिकारी, मुंबई
१७. संचालक, लेखा व कोषागरे, मुंबई
१८. मुख्यलेखा परिक्षक, स्थानिक निधीलेखा, कोकण भवन, मुंबई
१९. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कं. मर्या., प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.

२०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, सुत्रधार कंपनी मर्या., प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१
२१. वित्त विभाग (व्यय-१६)
२२. नियोजन विभाग (कार्यासन-१४६१)
२३. पर्यावरण/ ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने
२४. निवड नस्ती

शासन निर्णय क्र.रासयो-२०१९/प्र.क्र.३९/तां.क.२, दिनांक ०७ मार्च २०१९ सोबतचे सहपत्र
प्रपत्र-अ”

Conservation of Dharmaveer Sambhaji lake at Dis. Solapur

Sr.No	Description	amount in croroe
	Demarcation of lake boundary	१२.३५
१	Core scheme	
A	pollution prevention of lake	
A.१	Pollution of PHYTORID Technology (१ MLD) plant of approximate २ crores)	२००.१२
A.२	Removal of sludge phase I (Central Portion of the Lake Body) (१८०००० cubic meter @ Rs ३०० per cubic meter)	५७५.५०
B	De-Weeding of lake	
c	Removal of sludge phase II (pockets on Northern and southern tide of Lake) (९०००० cubic meter at Rs. ३०० per cubic meter)	२७०
D	Up gradation of toilets	५.५३
E	Provision of floating rafters	६.२७
F	up-gradation of washing facility (Dhobi Ghat)	५.०
G	Aeration system (jet type fountains) २ nos.	१०.०६
H	Arrangement for idol immersion	५.०
I	provision of silt type	०.३४
J	Avenue Plantation and afforestation (१५०० Plants)	१३.५९
२	Noncore scheme	
	Infrastructure Development and Beautiful of lake	
A	Repair to damaged reforming wall	१.९९
B	Railing on the existing compound	१७.२२
C	Provision of walkway and solar lights	२९.१९
D	providing concrete benches	३.००
E	Development of entrance Zone	१.१६
३	Public awareness program	८.००
	Total Cost of Project	१२.२११३

Shuddhodhan D Aher

Digitally signed by Shuddhodhan D Aher
DN: CN = Shuddhodhan D Aher, C = IN, S = Maharashtra, O = Government of Maharashtra, OU = Environment Department
Date: 2019.03.07 17:42:09 +05'30'

(शु. द. आहेर)
उप सचिव (पर्यावरण),
महाराष्ट्र शासन

शासन निर्णय क्र.रासयो-२०१९/प्र.क्र.३९/तां.क.२, दिनांक ०७ मार्च, २०१९ सोबतचे सहपत्र

प्रपत्र-"ब"

धर्मवीर संभाजी तलाव संवर्धन, सोलापूर

१) सदर योजनेंतर्गत राज्य शासनाची वित्तीय दायित्व रु. ७.३२६७८ कोटी असून उर्वरित रु. ४.८८४५२ कोटीचे दायित्व हे सोलापूर महानगरपालिकेचे असेल.

२) प्रकल्पाचा खर्च मंजूर वित्तीय मर्यादेपेक्षा अधिक झाल्यास त्याचे वित्तीय दायित्व हे महानिर्मितिची असेल.

३) प्रकल्प मंजूरी दिनांकापासून २४ (चोवीस) महिन्याच्या आत पूर्ण करावा लागेल आणि ठरवून देण्यात आलेली कालमर्यादा बंधनकारक असेल. प्रकल्प राबविण्यास विलंब होउन प्रकल्प खर्चात वाढ झाल्यास त्याचे वित्तीय दायित्व हे महानिर्मिति यांचे राहिल.

४) आयुक्त, सोलापूर महानगरपालिका प्रकल्पाच्या पूर्णतेनंतर व्यवस्थापनाची संपूर्ण जबाबदारी यांची असेल. याबाबत तश्या प्रकारचा सामंज्यस्य करार यापूर्वीच आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांच्यात झालेला असून त्यानुसार व्यवस्थापनासाठी सदर आदेश निर्गमित झाल्यापासून (नोडल एजन्सी) कार्यान्वित यंत्रणाची जबाबदारी असेल. आयुक्त, सोलापूर महानगरपालिका सदर प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर व्यवस्थापन व सनियंत्रण करण्यासाठी आर्थिक तरतूद करेल.

५) केंद्र शासन (एमओइएफ) राज्य शासन व सोलापूर महानगरपालिका यांनी २ (दोन) आठवड्याच्या आत प्रत्येक यंत्रणेची जबाबदारी सदर आदेश निर्गमित निश्चित करतील.

६) एनपीसीए संदर्भातील मार्गदर्शक सुचना सध्या केंद्र शासनाच्या विचाराधीन आहे त्यानुसार काही बदल झाल्यास सदरील मार्गदर्शक सुचना जशाच्या तश्या या प्रकल्पाला लागु होतील.

७) तलावाचे संवर्धन केल्यानंतर तलावाचे सांडपाणी औध्योगिक प्रदुषण किंवा घन कचरा यामुळे प्रदूषित होणार नाही यासाठी राज्य शासन त्यांच्या स्तरावर आवश्यकतेनुसार धोरणात्मक निर्णय घेतील.

८) प्रकल्पाचे कार्यान्वय किंवा प्रगती योग्य नसल्याचे दिसून आल्यास दिलेली मान्यता काढून घेण्याचे संपूर्ण अधिकार केंद्र शासनाला असतील.

९) आयुक्त, सोलापूर महानगरपालिका या पुर्वीच आश्वासित केल्याप्रमाणे कोणत्याही प्रकारे फ्लाय ॲश तलाव क्र. ३ मध्ये जाणार नाही याची काळजी घेतील.

३. प्रशासकीय वित्त मान्यता खालील अटी व शर्तिच्या अधीन राहिल: -

३.१ **<u>वित्तीय बाबी</u>:**

१) केंद्र शासनाकडून प्रकल्पासाठी निधी प्राप्त होताच राज्य शासन/महानिर्मिती ६०:४० मधील सहभाग तातडीने अदा करेल व त्याप्रमाणे केंद्र शासनास कळवितील व पुढील राज्य शासन महानिर्मितीने निधी दिल्यानंतरच वितरित केला जाईल.

२) वाटप करण्यात आलेला निधी परिशिष्टमध्ये नमूद करण्यात आलेल्या बाबींवरच खर्च करण्यात यावा. त्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही बाबीवर खर्च करता येणार नाही.

३) ज्या बाबीसाठी मान्यता देण्यात आली आहे त्या बाबीव्यतिरिक्त इतर कोणत्याही कामावर खर्च करता येणार नाही. जर त्या बाबीवर खर्च होणार नसेल तर सदरील रक्कम केंद्र शासनास व्याजासह परत करावी लागेल.

४) केंद्र शासन किंवा राज्य शासन यांच्या सध्या चालू असलेल्या बाबींवर पुनश्च या प्रकल्पाअंतर्गत खर्च करता येणार नाही.

५) देण्यात आलेला निधी संपूर्णपणे वापरण्याची व तो कोणत्याही परिस्थितीत अखर्चित राहणार नाही, याची काळजी घेण्यात यावी.

६) प्रकल्पावरील संपूर्ण खर्चाची देयके ही बँकेमार्फतच अदा करण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत रोख रकमेद्वारे देयके अदा करण्यात येणार नाही.

७) जिएफआर व आर्थिक व्यवहार याबाबत केंद्र शासनाने दिलेले निर्देश कार्यान्वित यंत्रणेवर (एम्एम्आरडीए) बंधनकारक राहिल.

८) प्रकल्पासाठी मंजूर करण्यात आलेली रक्कम ही वेगळ्या बँक खाते उघडून त्यामध्ये ठेवण्यात यावी व त्यावरील प्राप्त व्याज हे प्रकल्पाच्या रकमेत समावेश करण्यात यावे. विनियोग प्रमाणपत्र (Utilisation Certificate) सादर करताना त्या रकमेचा समावेश करण्यात यावा.

९) टीडीएस/सर्विस टॅक्स अदा केल्याबाबतचे प्रमाणपत्र (Utilisation) सोबत जोडण्यात यावे. त्याचप्रमाणे केंद्र शासनाच्या डीबीटी मार्गदर्शक सुचनांचे पालन होइल याची जबाबदारी कार्यान्वित नियंत्रणेची असेल.

१०) कार्यान्वित नियंत्रण या प्रकल्पासाठी राज्य शासन/महामंडळ/स्वायत्त किंवा खाजगी संस्था यांचेकडून कोणत्याही परिस्थितीत या प्रकाल्पावर वित्तीय सहाय्य घेता येणार नाही.

११) तलाव संवर्धनानंतर त्याचे व्यवस्थापन व निर्माण होणाऱ्या (Assets) मालमत्तेच्या व्यवस्थापनाची जबाबदारी कार्यान्वित यंत्रणेची असेल. निर्माण झालेली मालमत्ता कोणत्याही प्रकारे केंद्र शासनाच्या मान्यतेशिवाय निकाली काढता येणार नाही.

१२) निधीची उपयोगिता प्रमाणपत्र जिएफआर १९ A अन्वये निर्धारित केलेल्या प्रपत्राप्रमाणे विभाग प्रमुख यांच्या स्वाक्षरीने केंद्र शासनास पाठवावे लागेल.

१३) कार्यान्वित नियंत्रण वित्तीय खर्चाबाबतचा तपशील त्रैमासिकरित्या २० तारखेच्या आत सादर करावा.

१४) कार्यान्वित नियंत्रण प्रकल्पाच्या विकासाबाबत (पीपीआर) बाबतची त्रैमासिक माहिती विभागाची मुख्य अभियंता (CE) किंवा विभाग प्रमुख (HOD) यांच्या स्वाक्षरीने केंद्र शासनास सादर करावे.

३.२ **<u>लेखापरीक्षण:</u>**

अ) नियामक आणि महालेखा परीक्षक याना केलेल्या खर्चाची तपासणी करण्याचा संपूर्ण अधिकार असेल.

ब) पर्यावरण विभागाचा लेखापरीक्षक विभागास या प्रकाल्पवर झालेल्या खर्चाचे लेखे तपासण्याचा अधिकार असेल.

क) कार्यान्वित नियंत्रण प्रकाल्पावर झालेल्या खर्चाचे त्रैमासिक अहवाल लेखा परिक्षण करुन ९ (नऊ) महिन्याच्या आत केंद्र शासनाकडे पाठवेल त्यानुसार या प्रकल्पामुळे डीपीआर प्रकल्प अहवालानुसार झालेला बदल केंद्र शासनास कळवेल.

३.३ **<u>प्रकल्प व्यवस्थापन व देखरेख:</u>**

अ) कॅबिनेट सेक्रेटरी चे डीओ पत्र क्र. २६१/१/१०/२०००-Cab दिनांक ४ जून २००१ तसेच नियोजन आयोजकाचे डीओ पत्र क्र. १४०१५/२/९८-PAMD दिनांक १९.०८.१९९८ नुसार प्रकल्प वेळेवर कार्यान्वित करण्याची जबाबदारी कार्यान्वित यंत्रणेची असेल व प्रकल्पास झालेला विलंबाबाबत केंद्र शासन गंभीर

असून कुठल्या अधिकाऱ्यामुळे विलंब झाल्यास संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध कार्यवाही करण्यात यावी अशा सुचना आहेत.

ब) अंतरविभागीय स्वनियंत्रण समिती राज्य शासन/केंद्र शासित प्रदेश आणि विभागीय/जिल्हास्तरावर स्थापन करण्यात यावी. राज्य स्तरीय समितीचे अध्यक्ष त्या विभागाचे प्रमुख असतील आणि प्रकल्प राबविण्याकारिता त्या संबंधित विभागवार अधिकारी या समितीमध्ये समाविष्ट राहतील. सदर निवड समिती प्रकल्प वेळेत व गुणवत्तापूर्वक राबविण्यासाठी लक्ष देईल.

क) केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाचे डीओ पत्र क्र. J-१६०/११/१७/२००७-NRCD-II दिनांक १७.०९.२००९ प्रमाणे निर्देशित केल्यानुसार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सनियंत्रण समिती स्थापन करावी लागेल (शहर स्तरीय सनियंत्रण समिती). या समितीची कार्यकक्षा प्रकल्प राबवित असताना आणि प्रकल्प योग्य रित्या राबवून प्रकल्पाची अंमलबजावणी पारदर्शक होइल याबाबत काळजी घ्यावी.

ड) कार्यान्वित नियंत्रण प्रकल्प राबवित असताना तो योग्य रित्या राबवित आहे किंवा कसे या बाबतची तपासणी करण्याबाबत केंद्र शासन त्यांचा स्तरावरील अधिकाऱ्याची नेमणूक करेल. सदर अधिकाऱ्याच्या प्रकल्प भेटीवेळी आवश्यक त्या सुविधा पुरविण्याची जबाबदारी कार्यान्वित नियंत्रणेची असेल.

इ) निधी उपयोगिता प्रमाणपत्र पाठवित असताना प्रकल्पाची भौतिक प्रगती दाखविण्याकरिता उपग्रह फोटो निधी उपयोगिता प्रमाणपत्रासोबत जोडण्यात यावे. या फोटोमध्ये दिनांक, अक्षांक व रेखांक दाखविण्यात यावा व सदर फोटो कार्यान्वित नियंत्रण संकेत स्थळावर अपलोड करावे.

फ) प्रकल्पाच्या अंमल बजावणीच्या वेळी कार्यान्वित यंत्रणेने (IA) नेमणूक केलेले कर्मचारी हे कोणत्याही परीस्थितीत शासनाचे कर्मचारी समजण्यात येणार नाहीत. सदरील कर्मचारी हे फक्त प्रकल्प पूर्ण होण्यापर्यंतच्या कालावधी पर्यंतच असेल त्यानंतर त्यांच्या सेवा आपोआपच संपुष्टात येतील व त्यांची जबाबदारी हि कोणत्याही प्रकारे शासनाची असणार नाही. करार पद्धतीने नेमणूक केल्यास त्यांचा भविष्य निर्वाह निधी आणि ESI वसुली हि नियमाप्रमाणे असेल.

Shuddhodhan D Aher Digitally signed by Shuddhodhan D Aher
DN: CN = Shuddhodhan D Aher, C = IN, S = Maharashtra, O = Government of Maharashtra, OU = Environment Department
Date: 2019.03.07 17:42:27 +05'30'

(शु. द. अहेर)
उप सचिव (पर्यावरण),
महाराष्ट्र शासन